# लावण्य प्रज्ञेतच फक्त तये उजळावे !

अनिलांच्या 'सांगाती' या कवितासंग्रहा मध्ये एक 'दशपदी' आहे. 'लावण्य' नावाची. पु.शि.रेगे यांची एक 'अष्टपदी' आहे. 'गंधरेखा' या त्यांच्या कवितासंग्रहात. 'लावण्याला असल्या'.

अनिलांच्या 'लावण्य'च्या पहिल्या दोन ओळी अशा आहेत:

> "असें कांहीतरी आगळे लावण्य केव्हा कधीकाळी दिसून जातें
> वेगळया सौंदर्य - पर्युत्सुक जीवा जन्मांतरीचें सांगत नातें."

अनिलांना काही 'आगळे लावण्य' दिसते तेव्हा त्याच्याशी आपले जन्मांतरीचे नाते असल्याचा भास होतो. पण, पु.शि.रेग्यांना असे आगळे-वेगळे लावण्य दिसल्यावर त्यांची प्रतिक्रिया खूपच तीव्र आहे. ते म्हणतात,

"लावण्याला असल्या असण्याचा हक्कच ना;" प्रत्यक्षात असूच शकत नाही असे लावण्य !

अनिलांच्या 'लावण्य' या कवितेचा उल्लेख विजया राजाध्यक्ष यांनी आपल्या एका आठवणीत केला आहे. 'कवीतारती' मध्ये – 'सारेच दीप कसे उजळले आता ......" या लेखात. याची एक छानशी आठवणगोष्टच सांगितली आहे त्यांनी:

"आधी 'जन्मांतरीची ऐवजी ' जननांतरीचे' असा शब्द होता. (याला अनिल श्रुत योजना असे म्हणतात.) पण कुसुमावतींनी 'जन्मांतरीचे' हा शब्द सुचवला आणि अनिलांनी तो स्वीकारला. आपण ही कविता पुढे पाहू या.

> "नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असते कांही.
> ठाव त्याचा कधी लागत नाही आणि आठवण बुजत नाही.
>         रूप रेखेंत बांधलेलें तरी मोकळी खेळते त्यातून आभा
>         डोळयाआडच्या दीपज्योतीहून निराळी भासते प्रकाशप्रभा
>         आधीच पाहिलें पाहिलें वाटतें पहिलेच होते दर्शन जरी
> स्मरणाच्या सीमेपलिकडलें कुठले मीलन जाणवते तरी
> पुन्हा तहानलेले होतात प्राण, मन जिव्हाळा धाडून देतें
> जागच्या जागीच राहून ह्रदय प्रीतीचा वर्षाव करून घेतें !"

अशीच आणखी एक दशपदी आहे, अनिलांची. 'जुई' म्हणून. तीही 'लावण्या'चीच कविता आहे. पण हे आहे 'शुभ्र जुईचे हिरवे लावण्य' !

“पावसाची सर ओसरून जाते, उगाच तुषार भिरभिरती
इवल्या इवल्या फुलीं भरलेल्या अंगनिथळत्या जुईभवती.
आधीच हिरवा सुवास कोमल त्यांत जळाआंत विरघळला
ओल्या झुळकींत भरून वारा नेत असतो, अशा वेळेला
तलम ढगांच्या सात घड्यांतून गाळीव पडतें सौम्य चांदणें
जाळीच्या पडद्यामधून दिसतें जुईचे नितळ रूप देखणें
कवळया फांद्यांचा लवचिक बांधा पाचूच्या पानांत झाकून घेत
शुभ्र शुचितेची सौजन्यकांति हिरवे लावण्य लेवून येत
मादकता जाते मार्दवी विरून, सौंदर्य सोज्वळाआड दडतें
सोलीव सुखाचें स्वप्नच एक जीवाला जागतेपणीं पडते !”

जुईचे लावण्य इथे, ‘अंगनिथळती जुई’, ‘नितळ रुपाची जुई’, ‘कवळया फांद्यांच्या लवचिक बांध्याची जुई’, ‘शुभ्र शुचितेची सौजन्यकांती असलेली जुई’ आणि ‘हिरवे लावण्य लेऊन आलेली जुई’ अशा प्रतिमांनी सजलेले आहे. शेवटच्या दोन ओळींमध्ये, जुईचे रूप सोज्वळ आणि त्याच्या आड दडलेले असे जुईचे सौंदर्य, अशी आणखी एक सुंदर प्रतिमा अनिलांनी वापरली आहे. आपल्या मनात, एकाच वेळी शुभ्र सुचिता, सौजन्यकांती आणि सोज्वळ सुंदरता यांनी एक वेगळेच स्त्री-रूप उभे केले आहे.

विजया राजाध्यक्षांनी आणखी एक आठवणगोष्ट सांगितली आहे. “ या शेवटच्या दोन ओळी ऐकून कुसुमावती म्हणाल्या “ या तुमच्या ओळी वाटत नाहीत !” नंतर काही दिवसांनी अनिल व कुसुमावती एका बंगाली मुलीच्या लग्नाला गेले. मुलगी सुंदर दिसत होती. घरी आल्यावर त्या चेहऱ्याच्या आठवणीने कुसुमावतींच्या डोळ्यांत पाणी तरारले. त्या म्हणाल्या, ‘इतकी सुंदर मुलगी होती ! मी कधी तिचा चेहरा विसरणार नाही. सौंदर्याला सोज्वळाचं आवरण कसं असू शकतं, हे आज कळलं ---- तुमच्या ओळी कळल्या” आपल्यालाही त्या ओळी या आठवणींतून कळतात.

पु.शि.रेगे यांच्या ‘गंधरेखा’ या काव्यसंग्रहात ‘लावण्याला असल्या’ ही कविता आहे. ती अशी :

लावण्याला असल्या असण्याचा हक्कच ना;
प्रज्ञेंतच फक्त तयें उजळावें, आणि पुन्हां
जळतांना, घडवावी प्रतिमा निस्तुल काळया
काळया पाषाणांतून शब्दांतून थिजलेल्या-
निजलेला चेंगट जो खर्व – युगें भूगर्भी,
थिजलेला खोल ह्रदीं, उरला जो संदर्भी.
छिन्नीला या माझ्या एक भुकी धार असे,

शब्दाला अर्थ उष्ण. मुढे, तुज सांगुं कसें?

कवितेचा आशय सर्वांना एकच सापडेल असे नाही. जो तो आपापल्या स्वतंत्र आशयाची कावड भरून घेऊन जातो. 'सुह्रदगाथा' या नावाने, पु.शि.रेगे यांच्या निवडक कवितांचे संपादन, गंगाधर पाटील यांनी केले आहे. त्यात, या कवितेविषयी त्यांनी लिहिले आहे की, "आपल्या सौंदर्याचा तोरा मिरवणाऱ्या एका लावण्यवतीला पाहताच सौंदर्यनिर्मिती करणाऱ्या कविप्रतिभेचे सामर्थ्य जागे होते. आपण कलात्मक सौंदर्याची अशी एक प्रतिमा निर्माण करू की, तिच्यापुढे त्या लावण्यवतीचे प्रत्यक्षातील सौंदर्य फिके पडेल, असे कवीला वाटते....." गंगाधर पाटील यांना, कवितेच्या पहिल्या ओळीतून, म्हणजे, "लावण्याला असल्या असण्याचा हक्कच ना," यातून "आपल्या सौंदर्याचा तोरा मिरवणारी" लावण्यवती का दिसली, हे काही कळत नाही. वाचक-अभ्यासकाने कवितेवर उगीचच लादलेला असा हा अर्थ वाटतो. कवितेतील ही ओळ म्हणजे चक्क एक विधान आहे. कवीला आश्चर्यचकित करणाऱ्या स्त्री-सौंदर्याबाबतचे हे विधान आहे. ती इतकी सुंदर आहे, इतकी सुंदर आहे की, असे काही सौंदर्य असणेच शक्य नाही, अशी कवीची भावना झाली आहे. प्रत्यक्षात नव्हे तर कल्पनेतच असे सौंदर्य असू शकते, असा हा कवीचा भाव आहे.

गंगाधर पाटील आपल्या, या कवितेवरील छोट्याशा टिपणात, आणखी काही कामे कवीवर लादू पाहतात; आणि यासाठी ती लावण्यवती व कवी यांच्यात उगीचच स्पर्धा लावून देतात. वरच्या परिच्छेदातील पाटील यांच्या टिपणातील उद्‌धृतात दिल्याप्रमाणे, कवीवर एक ईर्षा लादतात. "........ आपण कलात्मक सौंदर्याची अशी एक प्रतिमा निर्माण करू की, तिच्यापुढे त्या लावण्यवतीचे प्रत्यक्षातील सौंदर्य फिके पडेल". कवीने असे, त्या लावण्यवतीला हरवण्याचे काम कशाला करायचे? दुसरी बाब अशी की, पाटील यांच्या मते, " कविमनातील कलावंताजवळ 'भुकी धार असलेली छिन्नी' आणि 'उष्ण अर्थाचा शब्द' असतो. त्याच्या सहाय्याने तो त्या लावण्याची एक 'निस्तूल प्रतिमा निर्माण करू पाहतो. पाटील यांची येथे मुख्य चूक अशी झाली आहे की, कवितेतील 'निस्तुल' हे विशेषण त्यांनी निर्माण होणाऱ्या प्रतिमेला लावले आहे. खरे ते पाषाणाच्या 'काळे'पणाचे विशेषण आहे. "निस्तुल काळ्या काळ्या पाषाणांतून." आणि मग हे कवीवरच आणखी एक काम लादतात. " लावण्याची एक निस्तुल प्रतिमा निर्माण" करण्याचे.

याच टिपणात गंगाधर पाटील, आणखी एक गडबड करतात. मूळ कवितेतील " घडवावी प्रतिमा ----- शब्दांतुन थिजलेल्या ---" हा 'शब्द' कसा आहे, तर तो "थिजलेला खोल ह्रदीं, उरला जो संदर्भी" असा आहे. म्हणजे वर्षांनुवर्षे ह्रदयात खोलवर थिजून बसला आहे, केवळ त्याच्या संदर्भांनेच तो जाणवतो आहे. आता (बर्फासारख्या) थिजलेल्या शब्दाला जागे करायचे तर साहजिकच, 'उष्णअर्थ' घेऊनच त्या शब्दाकडे जायला हवे. येथे, कवीने स्पष्टपणे ' शब्दाला अर्थ उष्ण' असे म्हटले असताना, पाटील मात्र 'उष्ण' हे विशेषण थेट त्या छिन्नीच्या धारेच्या भुकेला जोडतात. पाटील म्हणतात, " त्या रूपगर्वितेचे प्रत्यक्षातील लावण्य आणि त्याच्यावर मात करू पाहणाऱ्या कलावंत मनाची सौंदर्यवेधी 'उष्ण भूक' यांच्यामधील ताणाने निर्माण झालेली एक 'भाववृत्ती' या कवितेत चित्रित केली आहे." कवी आणि लावण्यवती यांच्यात, पाटील यांनी स्पर्धा लावल्याने, लावण्यवतीवर 'मात' करण्याची भाषा केली आहे. पुन्हा, "सौंदर्यवेधी 'उष्ण भूक' असे काहीतरी त्रांगडे केले आहे. म्हणजे असे की, भुकेला उष्ण हे विशेषण जोडून पुन्हा उष्ण भुकेला 'सौंदर्यवेधी' हे (आगगाडीच्या डबल इंजिनासारखे) आणखी एक विशेषण लावले आहे. आणि शेवटी निष्कर्ष असा काढला आहे

की, “ त्या रूपगर्वितेचे प्रत्यक्षातील लावण्य (वास्तविक कवितेत ती सुंदर स्त्री काहीच म्हणत नाहीये असे असताना, पाटील तिला ‘रूपगर्विता’ का म्हणतात हे मला उमजत नाही !) आणि त्याच्यावर मात करू पाहणाऱ्या कलावंत मनाची (कलावंत मन म्हणजे प्रत्यक्ष कवीचे की, या कवितेत आलेल्या दोन प्रकारच्या कलावंतांची – एक मूर्तीकार आणि दुसरा वाङ्मयनिर्माता – ती मने आहेत असे मानायचे?) सौंदर्यवेधी उष्ण भूक यांच्यामधील ताणाने निर्माण झालेली एक ‘भाववृत्ती’ या कवितेत चित्रित केली आहे. हे सारे म्हणणे खूप गोंधळाचे वाटते. वास्तविक कवितेचा अर्थ लावणे फारसे कठीण नाही.

पु.शि.रेगे यांची ही कविता, एक उत्कृष्ट कविता आहे. तिच्यात जसे भावसौंदर्य आहे तसेच रचनेचेही एक आगळे-वेगळे सौंदर्य आहे. हे कवितेचे वैशिष्ट्य आहे. आपण जरा या कवितेची मांडणी बदलून कवितेत उतरू या.

१. लावण्याला असल्या असण्याचा हक्कच ना;
   प्रज्ञेतच फक्त तयें उजळावें.
२. आणि पुन्हा जळतांना,
३. घडवावी प्रतिमा
४. निस्तुलकाळया काळया पाषाणांतून

निजलेला चेंगट जो खर्व-युगें भूगर्भी,

जो संदर्भी.

छिन्नीला या माझ्या एक भुकी धार असे,

५. शब्दांतुन थिजलेल्या-

थिजलेला खोल ह्रदीं, उरला

शब्दाला अर्थ उष्ण

आता या मांडणीतील पाच मुद्यांच्या स्पष्टीकरणाकडे वळू या.

१. कवीला असे काही अद्वितीय सौंदर्य दिसते, (जसे अनिल व कुसुमावतींना एका लग्नात एका बंगाली मुलीचे सौंदर्य दिसले, तसेच काहीतरी !) की कवी हबकून जातो; विश्वासच बसत नाही की, प्रत्यक्षात असे काही सौंदर्य, इतकी सुंदर मुलगी असू शकेल. कवीच्या मनात येते  की, “ छे, छे असे सौंदर्य प्रत्यक्षात नव्हे तर ते केवळ जाणीवेतच असू शकेल, “प्रज्ञेतच फक्त तयें उजळावे.” पु.शि. रेगे यांचे शब्द-अर्थ सामर्थ्य दाखविणारी पहिली ओळ येते ती अशी की, “लावण्याला  असल्या असण्याचा हक्कच ना,” ‘असण्याचा हक्कच नाही या सौंदर्याला’ ही टोकाची स्थिती, रेगे गाठतात, यातून ते कमालीच्या

अविश्वसनीय, अद्भूत अशा सौंदर्याची प्रतीती वाचकाला देतात. उद्गारवाचक विधान ठाणपणे वाचकासमोर आदळतात. आणि मग येते ती कलावंताच्या कलानिर्मितीची प्रक्रिया.

२. एखादे अद्भूत असे सौंदर्य केवळ प्रज्ञेतच उजळते, आणि

३. कलावंत कलानिर्मिती करू लागतो.

४. कवितेतील एक कलावंत, अगदी प्रत्यक्षात असूच शकणार नाही अशी सौंदर्यपूर्ण मूर्ती घडवू लागतो. चांगल्या मूर्तीच्या निर्मितीसाठी खर्व युगे भूगर्भात थिजलेला असा निस्तुल काळा काळा पाषाणच हवा त्याला ! निर्मितीच्या प्रक्रियेत त्याची प्रतिभा – त्याची छिन्नी – छिन्नीची धार, प्रतिभा ही निर्मितीची तीव्र भूक लागल्यासारखी चालू लागते.

५. कवितेतील दुसरा कलावंत, संदर्भांकरवी खोलवर थिजलेल्या शब्दाचा शोध घेतो; नुकत्याच पाहिलेल्या अतीव सौंदर्याचा 'उष्ण अर्थ' शब्दाला देऊन आपली सुंदर कलाकृती निर्माण करू पाहतो.
दोन कलावंताच्या कलानिर्मितीच्या दोन पण समांतर प्रक्रिया कवीने येथे मांडल्या आहेत.
आणि शेवटी, " मूढे, तुज सांगू कसे?" अशी कलानिर्मितीच्या प्रक्रियेच्या बाहेरची वास्तवातली अर्धी ओळ येते. ती थेट पहिल्या ओळीतील लावण्यवतीच्या, कवीच्या मनातील अवाक स्थितीच्या अनभिज्ञतेशी जोडली गेली आहे.

अनिलांच्या 'लावण्य' या कवितेतील दोन ओळी पु.शि.रेग्यांच्या 'लावण्याला असल्या' या कवितेतील पहिल्या दुसऱ्या ओळीशी अर्थसाधर्म्य दर्शवितात. पु.शिं. ची ओळ आहे,

> "लावण्याला असल्या असण्याचा हक्कच ना;"
> कवी अनिलांच्या दोन ओळी अशा आहेत.
> "नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असते काही
> ठाव त्याचा कधी लागत नाही, आणि आठवण बुजत नाही.

निखळ सौंदर्याचा ठाव लागत नाही हेच खरे. प्रत्यक्षापेक्षा प्रज्ञेतच त्याचे अस्तित्व !

❖